• वर्ष : ०३ • अंक : ३४५ • पुणे • शनिवार, दि. ०५ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक





धर्म रस्त्यावर नकोच 3



दोन गावठी पिस्तूलांसह १० जिवंत काडतुसे जप्त 4

# निर्विघ्न गणेशोत्सवासाठी सर्वांचे सहकार्य गरजेचे

## पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचे मत; पुणे दहीहंडी महोत्सवाचे उद्‌घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"गणेशोत्सव हा पुण्याच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्वाचा उत्सव आहे. हा उत्सव उत्साहात तसेच शांततेत आणि निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी नागरिक, गणेश मंडळे, कार्यकर्ते आणि पोलिस प्रशासन या सर्वांचे सहकार्य आवश्यक आहे," असे मत पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी व्यक्त केले. तुकाराम ओंबाळे यांचे कार्य आपल्या सर्वांसाठी प्रेरक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

आनंदनाथ ट्रस्ट आणि राष्ट्रप्रथम ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित 'पुणे दहीहंडी महोत्सवा'च्या उद्‌घाटनप्रसंगी अमितेश कुमार बोलत होते. 'महाराष्ट्र पोलिस कृतज्ञता' या संकल्पने अंतर्गत पोलिसांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या तुकाराम



ओंबाळे यांच्या प्रतिकृतीचे अनावरण करण्यात आले. अजमल कसाब याला पकडताना वीरमरण आलेल्या ओंबाळे यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीने त्यांची २० फूट उंच आणि १६ फूट रुंद भव्य प्रतिमा तयार करण्यात आली आहे. यावेळी पोलिस उपायुक्त कृषीकेश रावले, सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन हिरे, गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक शर्मिला सुतार, पोलिस निरीक्षक धनंजय पिंगळे, पोलिस निरीक्षक समाधान पवार, ओंबाळे यांची कन्या वंदना ओंबाळे, त्यांचे पती राजेंद्र माईके, उद्योजक चैतन्य रांगणेकर, पुणे दहीहंडी महोत्सवाचे अध्यक्ष वैभव वाघ, अथर्व पिसाळ, अनिल बटाणे उपस्थित होते. अमितेश कुमार म्हणाले, पुण्याचा गणेशोत्सव जागतिक स्तरावर न्यायचा असेल तर नव्याने 'पुणे पॅटर्न' तयार करावा लागेल. यावर्षी मंडळांनी आणि सर्वांनी योग्य पद्धतीने उत्सवात साथ देण्याचे ठरवले आहे, त्यामुळे उत्सव निर्विघ्नपणे पार पडेल अशी आशा आहे. सर्व मंडळांनी सामाजिक भान राखत उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देणारे उपक्रम राबवायला हवेत.

वैभव वाघ म्हणाले, पोलिस दल अहोरात्र आपल्या सेवेसाठी सज्ज असते. उत्सव आणि एरवीही त्यांच्यावर कामाचा ताण असतो. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे. दहीहंडी महोत्सवाच्या निमित्ताने दशावतार, भगवदगीता पठण, आपकी फर्माईश हा गाण्यांचा कार्यक्रम, खान्देशातील विविध नृत्यप्रकार सादर होणार आहेत.

## 'अभिनव बालगोपाळ सायकल दहीहंडी'द्वारे

# गरजू विद्यार्थ्यांना ३०० मोफत सायकल वाटप

- जेधे सोशल फाउंडेशन आणि इंद्राणी बालन फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दहीहंडीच्या उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत जेधे सोशल फाउंडेशन आणि इंद्राणी बालन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. पुण्यातील पहिलीच सायकलींची दहीहंडी असलेल्या 'अभिनव बालगोपाळ सायकल दहीहंडी' या उपक्रमाच्या माध्यमातून दुर्गम भागातील ३०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रवास अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. येत्या शनिवारी (ता. ५) दुपारी १२ वाजता जेधे मॅन्शन, ९०७, शुक्रवार पेठ, पंचमुखी मारुती मंदिराजवळ, पुणे येथे हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संयोजक जेधे सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व श्री शिव छत्रपती मित्र मंडळाचे अध्यक्ष कान्होजी दयानंद जेधे यांनी दिली. कान्होजी जेधे म्हणाले, "आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लागावा, यासाठी जेधे सोशल फाउंडेशन आणि इंद्राणी बालन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे. आंबेगाव व जुन्नर तालुक्यातील माळीण, अंबसरी बुद्रुक, शिरोली, नारायणगाव, ओझर, भीमाशंकर, शिरोली खुर्द आदी अतिदुर्गम भागातील गावांमधील, तसेच पुण्यातील झोपडपट्टी भागातील गरजू विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ दिला जाणार आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी दळणवळणाची सुविधा उपलब्ध व्हावी आणि त्यांच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे."

## ठळक बातम्या

### पुणेकर अनुभवणार 'दशावतार'

पुणे (आरंभ पर्व) : दहीहंडी हा महाराष्ट्रभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जाणारा उत्सव आहे. या उत्सवाचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन आनंदनाथ ट्रस्ट आणि राष्ट्रप्रथम ट्रस्ट यांनी अनोखी दहीहंडी साजरी करायचे ठरवले आहे. 'पुण्याच्या अभिमानाची दहीहंडी, पुण्याची सोन्याची दहीहंडी' या संकल्पनेअंतर्गत हा दहीहंडी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या दहीहंडी महोत्सवाच्या निमित्ताने पुणेकरांना कोकणातील प्रसिद्ध 'दशावतार' नाट्य अनुभवता येणार आहे, अशी माहिती पुणे दहीहंडी उत्सवाचे अध्यक्ष वैभव वाघ व सहकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### 'बोलणं बंद केलं' म्हणून संतापला...

अमरावती (आरंभ पर्व) : गेल्या दोन वर्षापासून जी मुलगी आपल्याशी चांगली बोलत होती, अचानकच तिने आपल्याशी बोलणे का बंद केले, याचा जाबही त्याने 'ती'ला विचारला होता. त्याचा तगादा तिच्या सहनशक्तीपलीकडे गेला होता. म्हणून तिने त्याच्याशी बोलणे बंद केले. ती त्याला टाळू लागली होती. त्यामुळे गेल्या महिनाभरापासून तो संतापाच्या आगीत धुमसत होता. त्याची परिणिती 'ती'च्या निघृण हत्येत झाली. गुरुवारी पोलिसांनी जेव्हा त्याला पकडले, कोठडी मिळविली तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर पश्चातापाचा लवलेशही नव्हता. राजापेठ पोलिसांनी आनंद भड (२२, रा. पोही, ता. मूर्तिजापूर) याला गुरुवारी रात्री गोंदिया येथून अटक केली. शुक्रवारी वैद्यकीय तपासणीनंतर त्याला स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी ८ सप्टेंबरपर्यंत त्याची पोलिस कोठडी मिळविली आहे. विशेष म्हणजे, मूर्तिजापूरला डिग्री आणण्यासाठी जातो, असे सांगून तो पोही या आपल्या गावाहून निघाला. मात्र मूर्तिजापूरला न जाता त्याने अमरावती गाठले. एका कॉमन फ्रेंडसह 'ती'ला देखील फोन कॉल केला. तो तिच्या कॉलेजजवळही घुटमळला. त्यानंतर त्याने तिच्या घरापासून पाठलाग केला. दरम्यान शुक्रवारी आ. रवी राणा यांच्या नेतृत्वात शेकडो लोक राजापेठ ठाण्यात पोहोचले. आरोपीला फासावर लटकवा, अशी मागणी त्यांनी केली.

### पुणे-मुंबई बुलेट ट्रेनची घोषणा...!

पुणे (आरंभ पर्व) : पुणे-मुंबई प्रवासासाठी दररोज रस्ते आणि रेल्वे वाहतुकीवर अवलंबून असलेल्यांना आता बुलेट ट्रेनमुळे मोठा दिलासा मिळणार आहे. पुणे-मुंबईदरम्यान बुलेट ट्रेन कॉरिडॉर विकसित करण्यात येणार असून, या मार्गावरून प्रवासाचा वेळ अवघा ४८ मिनिटांवर येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी गुरुवारी याबाबत घोषणा केली. या प्रकल्पामुळे पुणे आणि मुंबई ही दोन प्रमुख शहरे वेगवान रेल्वेने जोडली जाणार आहेत. 'मुंबईत वडापाव खाण्यासाठी आणि पुण्यात बाकरवडी खाण्यासाठी दिवसातून दोन वेळा जाता येईल', अशा मिश्कील शब्दांत त्यांनी या प्रकल्पामुळे होणाऱ्या वेळेच्या बचतीचे महत्त्व अधोरेखित केले.

# कोलवडी-साष्टेत गायकवाड मळ्यातील पानंद रस्ता वाहतुकीस खुला

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

कोलवडी-साष्टे (ता.हवेली) येथे गायकवाड मळ्यातील गट नंबर १२९५ व १२९६ पानंद रस्ता शिरूर - हवेलीचे आमदार तथा पानंद व शिवरस्ते अध्यक्ष ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या अधिपत्याखाली व प्रयत्नांतून उपविभागीय अधिकारी यशवंत माने व हवेली तालुक्याच्या अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते-पाटिल यांच्या तत्पर कामांमुळे व त्यांच्या आदेशाने वाहतुकीस खुला करण्यात आला असल्याचे कोलवडी-साष्टेचे आदर्श सरपंच विनायक गायकवाड यांनी माहिती देताना सांगितले. या गायकवाड मळ्यातील पानमंद रस्ता खुला करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सदस्या कोमल संदेश आव्हाळे, हवेली तालुका पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, पंचायत समितीच्या सदस्या सुषमा संतोष मुरकुटे, कोलवडी-



साष्टेचे लोकनियुक्त सरपंच विनायक गायकवाड, उपसरपंच प्रिया दिगंबर गायकवाड यांनी वेळोवेळी वरिष्ठ लोक प्रतिनिधी तर महसूल विभाग व वरिष्ठ स्तरावर शासनाकडे योग्य तो पाठपुरावा केल्याने हा पानंद रस्ता वाहतुकीस खुला झाला असल्याने त्यामुळे प्रयत्न केलेल्या सर्वांचे आभार येथील परिसरातील शेतकरी,ग्रामस्थांनी मानले आहे. हा गायकवाड मळ्यातील रस्ता खुला करण्यासाठी स्थानिक कोलवडी - साष्टेचे महसूल अधिकारी तलाठी, मंडलाधिकारी,पोलीस अधिकारी, शेतकरी बांधव व ग्रामस्थ यांनी विषेश सहकार्य केले.

# बार्टी पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांचे आमरण उपोषण अखेर स्थगित

## प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते ज्यूस पिऊन सोडले उपोषण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांनी न्याय्य हक्काच्या सरसकट फेलोशिपसाठी पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर सुरू केलेले प्रदीर्घ आमरण उपोषण अखेर आज सकारात्मक आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले. बार्टीच्या निबंधक सुचिता शिंदे आणि जात पडताळणी विभागाचे उपायुक्त संजय कदम यांच्या उपस्थितीत आंदोलक विद्यार्थ्यांनी ज्यूस पिऊन आपले उपोषण सोडले.

मागील अनेक दिवसांपासून बार्टीच्या विद्यार्थ्यांनी ३० ऑक्टोबर २०२३ चा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करावा आणि २०२३, २०२४ व २०२५ च्या सर्व पात्र संशोधकांना पूर्वलक्षी प्रभावाचा अन्याय न करता सरसकट फेलोशिप द्यावी, या मागणीसाठी तीव्र आंदोलन छेडले होते. या आंदोलनाची प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर गंभीर दखल घेण्यात आली. मुंबईत राज्याचे सामाजिक




न्याय मंत्री संजय शिरसाठ यांच्या शासकीय निवासस्थानी आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशनचे मार्गदर्शक राहुल डंबाळे आणि सचिव राहुल नागटिळक यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी प्रतिनिधींची एक महत्त्वाची बैठक पार पडली होती. या बैठकीत राहुल डंबाळे व राहुल नागटिळक यांनी मांडलेल्या कायदेशीर मुद्द्यांची दखल घेत, ३० ऑक्टोबर २०२३ पूर्वी नोंदणी झालेल्या २०२३ च्या विद्यार्थ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने नियम लागू न करता, २०२२ च्या निकषानुसार सरसकट फेलोशिप देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिले. या पार्श्वभूमीवर, बार्टीच्या महासंचालक दिपा मुधोळ-मुंडे यांनीदेखील शासनाच्या प्रधान सचिवांना अधिकृत पत्र लिहून विद्यार्थ्यांवर पूर्वलक्षी प्रभावाने अन्याय न करता 'सारथी' व 'महाज्योती'च्या धर्तीवर सरसकट फेलोशिप मंजूर करण्याची भक्कम शिफारस मंत्रालयाकडे केली आहे.

मंत्रालयातून आणि बार्टी प्रशासनाकडून मागण्यांच्या पूर्ततेसाठी सकारात्मक आणि ठोस पावले उचलली गेल्याचे अधिकृत पत्र प्राप्त झाल्यानंतर, आंदोलक विद्यार्थ्यांनी तूर्तास आपले आमरण उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. आज आंदोलनस्थळी बार्टी निबंधक सुचिता शिंदे व अधिकारी संजय कदम यांनी विद्यार्थ्यांची भेट घेतली व प्रमुख उपोषणार्थी संशोधक विद्यार्थी श्रीमती सुरेखा वासनिक, श्री. किरण देवकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मान्यवरांच्या हस्ते लिंबू पाणी आणि ज्यूस घेऊन उपोषणाची सांगता केली.

# दलित साहित्य ही समाजाची गरज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अस्पृश्यता ,जातीयता आणि त्यामधून माणसा माणसांमध्ये भेदाभेद आजही अस्तित्वात आहे . त्यामुळे दलित समाजाचे दुःख आणि वेदना आजही तसाच कायम आहेत. या वेदनेला फुंकर घालून दलित साहित्याने वास्तव मांडले . जातीयता संपवून सामाजिक सलोखा आणि समानता प्रस्थापित करण्यासाठी दलित साहित्याची आजही समाजाला गरज आहे अशी भावना ज्येष्ठ साहित्यिकांनी व्यक्त केली.

करुणादीप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्यातर्फे बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या उर्गेन आर्ट फेस्टिवल मध्ये कलाकार परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंतांनी दलित साहित्य आणि त्याचा कलेशी असणारा संबंध त्यांचा संदर्भात चर्चा केली. पद्मश्री ग्रंवाग संपतेन, डॉ. विमलताई एस. थोरात, शाहीर संभाजी भगत आणि कवी नितीन चंदनशिवे या चर्चासत्रामध्ये सहभागी झाले होते.




डॉ. विमल थोरात म्हणाल्या, महाराष्ट्रने सर्वप्रथम दलित साहित्याला जन्म दिला. आज हे दलित साहित्य संपूर्ण भारतामध्ये पसरले आहेत. भारताचे 22 भाषांपैकी 20 भाषांमध्ये सक्रिय लेखक दलितांचा संदर्भात लेखन करत आहेत. दलित साहित्य हे वेगवेगळ्या भाषांमध्ये भाषांतरित होणे गरजेचे आहे, शब्दशः नसले तरी त्याचा भावार्थ एका वर्षातून दुसऱ्या भाषेमध्ये पोहोचला तर त्यातून दलितांचे दुःखामध्ये समाजाच्या काळापर्यंत पोहोचू शकतात. शाहीर संभाजी भगत म्हणाले, सत्तेच्या राजकारणापलीकडे एक सांस्कृतिक राजकारण अस्तित्वात आहे . सत्तेचे राजकारण काही क्षण असतात परंतु सांस्कृतिक राजकारण मात्र कायमस्वरूपी असते. दलितांचे दुःख आणि वेदना मांडण्यासाठी समांतर सांस्कृतिक राजकारण उभे करण्याची गरज आहे . मनुवादी आणि ब्राह्मण्यवादी विचारांमधून दलितांवर कायमच अन्याय होत आला आहे, तो जुगारून देण्यासाठी समतावादी, मानवतावादी समाज निर्माण करण्यासाठी दलित साहित्याने आवाज म्हणून त्यांचे दुःख समाजासमोर मांडले पाहिजे. पद्मश्री ग्रंवाग संपतेन म्हणाले, तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील एकता ,समता बंधुता आणि न्याय यांचा समावेश असणारा समाज निर्माण होणे गरजेचे आहे . त्यासाठी दलित साहित्य हे अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. देश अखंडपणे समानतेच्या पायावर उभा राहिला तरच खऱ्या अर्थाने आपण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारत निर्माण झाला असे म्हणू शकतो. नितीन चंदनशिवे म्हणाले, कवितेच्या माध्यमातून वंचित आणि उपेक्षितांचे दुःख समस्या मांडले जात आहे ही मी माझे कवी म्हणून कामच समजतो. कोणत्याही कलाकाराला त्याची कला किंवा लेखक आणि कवीला मिळालेली लेखणी याला तेव्हाच खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त होते जेव्हा तो कलाकार कवी अथवा लेखक सर्वसामान्यांचे दुःख जाणून ते आपल्या कलेच्या माध्यमातून समाजासमोर मांडतो . कलेच्या माध्यमातून किंवा लेखणीतून भलेही ते दुःख दूर होणार नाही परंतु ते मांडता येणे गरजेचे आहे आणि ही निर्भीडता प्रत्येक लेखक आणि कवी मध्ये असणे गरजेचे आहे.

सुवर्णसंधी!

InDesign ऑपरेटरची गरज आहे!

मासिक पगार

आकर्षक पगार दिला जाईल




घरून काम (Work From Home)!

- अनुभवी आणि कल्पक ऑपरेटर हवा
- मासिक पगार (पात्रतेनुसार)
- इन-डिझाइन सॉफ्टवेअरचे उत्तम ज्ञान
- कामाचे लवचिक तास

संपर्क : ७२७६३१४१४२/८६६७८६५७०२

## थोडक्यात पण महत्वाचे




### Gen Zच्या वेदनांवर झंडु बामचा 'अनडू' मंत्र


कोलकाता (आरंभ पर्व) : सतत स्क्रीनकडे पाहिल्याने होणारी डोकेदुखी-मानदुखी, डूमस्क्रोलिंगमुळे जाणवणारा थकवा, ओव्हरथिंकिंग, करिअरचा ताण आणि दैनंदिन जीवनातील मानसिक कसरत... आजच्या Gen Zच्या आयुष्यातील या 'वेदनांना' नवी भाषा देत झंडु बामने #UndoWithZandu ही नवी कॅम्पेन सुरू केली आहे. ईमामी लिमिटेडच्या परिवारातील झंडु बामने आपल्या पारंपरिक आयुर्वेदिक वारशाला आधुनिक लोकप्रिय संस्कृतीशी जोडत १६ ते २८ वयोगटातील तरुण ग्राहकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला आहे. 'Gen Zला उपदेश न करता, त्यांच्याच भाषेत त्यांच्याशी संवाद साधा' या विचारावर ही मोहीम आधारित आहे. या कॅम्पेनमध्ये 'पेनलँड' नावाची काल्पनिक दुनिया साकारण्यात आली आहे. या जगात तरुणांना आधुनिक जीवनातील विविध प्रकारच्या त्रासांचा सामना करताना दाखवण्यात आले आहे. अशा वेळी एक उत्साही व्यक्तिमत्त्व त्यांच्या समस्यांवर तोडगा सुचवते आणि 'वेदनेला करा अनडू विथ झंडु' हा संदेश दिला जातो. झंडु बाम अनेक दशकांपासून डोकेदुखी, अंगदुखी आणि सर्दीमुळे होणाऱ्या त्रासासाठी भारतीय कुटुंबांमध्ये परिचित आहे. मात्र, आजच्या तरुण पिढीच्या जीवनशैलीत 'वेदना' या संकल्पनेचे स्वरूप बदलले आहे. त्यामुळे या मोहिमेत शारीरिक त्रासांसोबतच करिअरचा ताण, बर्नआउट, ओव्हरथिंकिंग, नात्यांमधील गुंतागुंत आणि सोमवारच्या कामाची चिंता अशा आधुनिक जीवनातील प्रसंगांचाही विनोदी आणि मनोरंजक पद्धतीने समावेश करण्यात आला आहे.

### स्कॅपिया-ॲक्सिस बँकेकडून नव्या पिढीच्या प्रवाशांसाठी क्रेडिट कार्ड

- दैनंदिन खर्चावर १० टक्क्यांपर्यंत रिवॉर्ड्स; ट्रॅव्हल बुकिंगवर २० टक्क्यांपर्यंत स्कॅपिया कॉइन्स

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील ट्रॅव्हल फिनटेक कंपनी स्कॅपिया आणि खासगी क्षेत्रातील आघाडीची बँक ॲक्सिस बँकेने 'स्कॅपिया ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड' सादर केले आहे. नव्या पिढीतील भारतीय प्रवाशांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या कार्डच्या माध्यमातून पेमेंट्स, रिवॉर्ड्स आणि ट्रॅव्हल बुकिंगचा डिजिटल अनुभव एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. या कार्डसाठी ऑनबोर्डिंग प्रक्रिया ३ सप्टेंबरपासून सुरू झाली आहे. स्कॅपिया ॲपच्या माध्यमातून ग्राहकांना खर्चाचे व्यवस्थापन व ट्रॅकिंग करण्यासोबतच फ्लाइट्स, हॉटेल्स आणि विविध प्रवासाशी संबंधित सेवांचे बुकिंग करता येणार आहे. पात्र दैनंदिन खर्चावर १० टक्क्यांपर्यंत रिवॉर्ड्स, तर स्कॅपिया ॲपवरील पात्र ट्रॅव्हल बुकिंगवर २० टक्क्यांपर्यंत स्कॅपिया कॉइन्स मिळणार आहेत. हे कॉइन्स फ्लाइट्स, हॉटेल स्टे, व्हिसा, विविध अनुभव आणि अन्य प्रवासाशी संबंधित सेवांसाठी रिडीम करता येतील. हे कार्ड मास्टरकार्ड आणि रुपे या दोन्ही नेटवर्कवर उपलब्ध आहे. दैनंदिन खर्चापासून प्रवासाचे नियोजन आणि बुकिंगपर्यंतचा डिजिटल अनुभव अधिक सुलभ करण्याचा या कार्डचा उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी शून्य फॉरेक्स मार्कअप आणि स्मार्ट फॉरेक्स सुविधा देण्यात आली आहे. यामुळे परदेशातील व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण मिळण्याचा दावा करण्यात आला आहे.

### विवोचा नवा T5 स्मार्टफोन लॉँच




- दमदार परफॉर्मन्स, प्रीमियम डिझाइन आणि AI फीचर्स; किंमत ₹३४,९९९ पासून

मुंबई (आरंभ पर्व) : विवो इंडियाने आपल्या परफॉर्मन्स-केंद्रित T-सिरीजमध्ये विवो T5 हा नवा स्मार्टफोन दाखल केला आहे. तरुण आणि तंत्रज्ञानप्रेमी ग्राहकांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये दमदार प्रोसेसर, मोठी बॅटरी, प्रीमियम डिस्प्ले, AI क्षमता आणि मल्टी-कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. विवो T5ची सुरुवातीची किंमत ₹३४,९९९ आहे. विवो T5मध्ये MediaTek Dimensity 7500 Turbo प्रोसेसरसह AI-रेडी NPU इंजिन देण्यात आले आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या तंत्रज्ञानामुळे 3B LLM मॉडेलवरील ऑन-डिव्हाइस AI जनरेशनमध्ये २३३ टक्क्यांपर्यंत वेग मिळतो. ४nm प्रक्रियेवर आधारित या चिपसेटमध्ये ऑक्टा-कोर CPU, Kraken GPU आर्किटेक्चर आणि आठव्या पिढीचे NPU देण्यात आले आहे. फोनमध्ये ७०५०mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली आहे. त्यासोबत १७.३५ सेंमी म्हणजेच ६.८३ इंचाचा 1.5K 144Hz 3D कर्व्ड AMOLED डिस्प्ले मिळतो. मोठी बॅटरी आणि प्रगत डिस्प्ले असूनही स्मार्टफोन स्लिम आणि हलक्या वजनाच्या फॉर्म फॅक्टरमध्ये तयार करण्यात आल्याचा कंपनीचा दावा आहे.

### नव्या पिढीच्या प्रवाशांसाठी संयुक्त-ब्रँडेड क्रेडिट कार्ड सादर

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीची ट्रॅव्हल फिनटेक कंपनी स्कॅपिया आणि भारतातील आघाडीच्या खासगी क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या ॲक्सिस बँकेने आज स्कॅपिया ॲक्सिस बँक क्रेडिट कार्ड सादर केले. भारतातील नव्या पिढीच्या प्रवाशांना लक्षात घेऊन हे कार्ड डिझाइन करण्यात आले असून, प्रत्येक खर्चाला त्यांच्या पुढील प्रवासाकडे नेणारे एक पाऊल मानले आहे. हे कार्ड पेमेंट्स, रिवॉर्ड्स आणि प्रवासाचा अनुभव एका एकत्रित डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणते. स्कॅपिया ॲपच्या माध्यमातून ग्राहकांना खर्चाचे व्यवस्थापन व ट्रॅकिंग, प्रवासाचे बुकिंग तसेच रिवॉर्ड्सचे रिडेम्प्शन करता येते. पात्र कार्ड खर्च आणि यूपीआय व्यवहारांवर रिवॉर्ड्स मिळतात. हे रिवॉर्ड्स फ्लाइट्स, हॉटेल स्टे, अनुभव, खरेदी आणि इतर प्रवासाशी संबंधित सुविधांसाठी वापरता येतात. मास्टरकार्ड आणि रुपे या दोन्ही नेटवर्कवर उपलब्ध असलेले हे कार्ड दैनंदिन खर्चापासून प्रवास सुरू होईपर्यंतचा अखंड डिजिटल अनुभव देण्यासाठी डिझाइन करण्यात आले आहे.

### महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषक 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो'च्या टॉप-४० मध्ये

मुंबई (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील तीन युवा नवोन्मेषकांनी 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टुमॉरो' या राष्ट्रीय नवोन्मेष उपक्रमाच्या टॉप-४० मध्ये स्थान मिळविले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्थिक समावेशन आणि पर्यावरणीय शाश्वतता या क्षेत्रांतील स्थानिक समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपाय शोधण्याचे काम हे युवा नवोन्मेषक करीत आहेत. सॅमसंगच्या या प्रमुख सामाजिक दायित्वाधारित नवोन्मेष उपक्रमाची ही पाचवी आवृत्ती असून, १४ ते २२ वर्षे वयोगटातील तरुणांना वास्तविक जीवनातील समस्या ओळखून त्यावर तंत्रज्ञानाधारित उपाय विकसित करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. यंदाच्या स्पर्धेतील 'एआय लिव्हिंग फॉर इंडिया' आणि 'एन्व्हायर्नमेंटल सस्टेनेबिलिटी' या दोन विषयांमध्ये महाराष्ट्रातील युवा नवोन्मेषकांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.







# मातृत्व, माणुसकी आणि मानवता या मूल्यांनाही महत्त्व दिले पाहिजे

## विधानपरिषद सदस्य आमदार डॉ. नीलम गोऱ्हे ; जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे आठवा आदर्श माता पुरस्कार प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मातृत्वाची संकल्पना आता अधिकाधिक व्यापक होत चालली आहे. आपल्या समाजात एखाद्याचे नाव विचारल्यानंतर त्याच्या जातीविषयी उत्सुकता निर्माण होते. आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांसारख्या महापुरुषांचे नाव घेतो, त्यामुळे मातृत्व, माणुसकी आणि मानवता या मूल्यांनाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे, असे मत विधानपरिषद सदस्य आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केले.



जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे विविध क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांना घडविण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या भामाबाई शिंदे, ज्योती कदम, स्वाती निम्हण आणि सुनीता लांजेकर यांना आठव्या आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. न-हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या ममता सपकाळ, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर उपस्थित होते. साडी, श्रीफळ, पुणेरी पगडी, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. संस्थेच्या खजिनदार सुरेखा सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. विधान परिषदेचे सभापती डॉ. राम शिंदे यांच्या मातोश्री भीमाबाई शिंदे, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या मातोश्री ज्योती कदम, नगरसेवक सनी निम्हण यांच्या मातोश्री स्वाती निम्हण आणि सिने दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या मातोश्री सुनीता लांजेकर यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला.

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, जेव्हा एखादा पुरुष यशस्वी होतो, तेव्हा त्याच्या पाठीमागे एका स्त्रीचा त्याग आणि योगदान असते. मात्र, एखादी महिला यशस्वी होते, तेव्हा तिच्या पाठीशी संपूर्ण समाज उभा राहतो, तेव्हा तिला यशाची पायरी दिसते. या दोन्ही परिस्थितींमध्ये मोठा फरक आहे. स्त्रियांचे काम अनेकदा अदृश्य राहते, त्यामुळे त्यांच्या श्रमाचा वाटा आणि योगदान दुर्लक्षित होते. भारतमातेच्या संस्कृतीत मातेला जो सन्मान दिला जातो, तो अत्यंत महत्त्वाचा आहे.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, प्रतिकूल आणि खडतर परिस्थितीतून आयुष्याचा प्रवास करत, आपल्या मुलांना विविध क्षेत्रांत घडविणाऱ्या माता समाजासमोर आल्या पाहिजेत. आज त्यांची मुले देशसेवेचे कार्य करत आहेत, ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. अशा मातांचा सन्मान करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आईची महती आणि तिचे योगदान प्रत्येक युवकाला व विद्यार्थ्याला समजले पाहिजे.

ममता सपकाळ म्हणाल्या, आदर्श माता असल्याचे सिद्ध करण्याची कसोटी खूप मोठी असते. ज्यांना जन्म देता आणि ज्यांना घडवता, ते जोपर्यंत काळाच्या कसोटीवर उतरत नाहीत, तोपर्यंत आपण आदर्श माता म्हणून सिद्ध होत नाही. सर्वाधिक गृहीत धरले जाते ते आईला. घराला घरपण आईमुळेच मिळते. घर पुढे जात असते; मात्र या प्रवासात सर्वांत शेवटी उभी असते ती आई. आपला संस्कारांचा वसा आपण जपत असतो. आपण दिलेला हा वसा जेव्हा समाजाच्या उपयोगी ठरतो, तेव्हा तीच आईसाठी खरी कृतज्ञता असते. ज्योती कदम म्हणाल्या, हा केवळ सन्मान नसून माझ्या मातृत्वाला मिळालेली प्रेमाची आणि कृतज्ञतेची पावती आहे. आई होणे ही कोणत्याही स्त्रीच्या आयुष्यातील सर्वांत सुंदर आणि तितकीच जबाबदारीची भूमिका आहे. मुलांना केवळ सुख-सुविधा देऊ नका, तर त्यांच्यात संस्कार, आत्मविश्वास आणि चांगली मूल्ये रुजविण्याचे काम करा.

सुनीता लांजेकर म्हणाल्या, कोणतीही आई स्वतःला आदर्श आई समजत नाही. ती केवळ आपल्या मुलांसाठी जे आवश्यक आहे, ते करत राहते. त्यांच्या आनंदात आनंदी होते आणि अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते. मुलांना मोठे करणे म्हणजे केवळ त्यांना यशस्वी बनवणे नव्हे, तर त्यांना एक चांगला माणूस घडवणे हे आईच्या हातात असते.

स्वाती निम्हण म्हणाल्या, आई म्हणजे आत्मा आणि ईश्वर यांच्या संयोगातून निर्माण झालेली शक्ती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना जिजामातेने घडविले, हे राजमाता जिजाऊंचे महान कार्य आणि कर्तव्य होते. जसे माझ्या आईने मला घडविले, तसेच मीही माझ्या मुलांना घडविण्याचा प्रयत्न केला.

## पुणे शहरातील प्रमुख पाच रस्त्यांच्या

# सफाईसाठी वर्षाला ७२ कोटींचा खर्च

### कामाच्या दर्जावर शिवाजीराव मते पाटील यांचा सवाल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील प्रमुख पाच रस्त्यांची स्वीपिंग मशीनद्वारे सफाई करण्यासाठी वर्षाकाठी सुमारे ७२ कोटी रुपये संबंधित ठेकेदाराला अदा केले जात असल्याचा दावा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खडकवासला विधानसभा प्रमुख शिवाजीराव मते पाटील यांनी केला आहे. मात्र, एवढा मोठा खर्च होत असताना प्रत्यक्षात रस्त्यांची नियमित सफाई होताना दिसत नाही, असा आरोप त्यांनी केला आहे. मते पाटील यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शहरातील प्रमुख रस्त्यांवर





स्वच्छतेची अपेक्षित कामे होत नसताना संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात नेमके काय सुरू आहे, असा सवाल त्यांनी केला आहे. रस्ते सफाईच्या कामावर प्रशासनातील संबंधित अधिकारी लक्ष देत नसल्याचे दिसून येत आहे. ठेकेदाराकडून प्रत्यक्ष काम करून न घेता त्याची बिले काढण्याचा आणि त्यातून कमिशनखोरी करण्याचा प्रयत्न सुरू आहे का, अशी गंभीर शंका मते पाटील यांनी व्यक्त केली आहे. या आरोपांची प्रशासनाने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

#### स्मार्ट पुणे सिटीच्या दर्जाबाबत प्रश्न

पुणे हे देशातील प्रमुख ए ग्रेड महानगरपालिकांपैकी एक असून, शहराच्या स्वच्छतेसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च होत असताना रस्त्यांची अवस्था समाधानकारक नसेल, तर स्मार्ट पुणे सिटीचा दर्जा आणि त्यासाठीची पात्रता याबाबत प्रशासनाने खुलासा करावा, असे मते पाटील यांनी म्हटले आहे. शहरातील नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित रस्ते मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे रस्ते सफाईच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी, ठेकेदाराच्या कामाचे मूल्यमापन आणि खर्चाचा पारदर्शक तपशील नागरिकांसमोर मांडावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### कृष्णा फायकस : दुर्मिळ वृक्षाचे रोपण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वनस्पती शास्त्रज्ञ कै. डॉ. वा. द. वर्तक उद्यानामध्ये कृष्णा फायकस या दुर्मिळ वृक्षाचे रोपण करून 'झाडे लावा, झाडे जगवा' हा समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आला. वृत्तपत्र लेखक अनिल अगावणे यांच्या हस्ते हे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे दामोदर बोकील, सुरेंद्र मारणे, नंदकुमार कोरे, मोहनराव देशमुख, ज्ञानोबा भुजबळ आदी मान्यवर तसेच बागेतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. बागेची देखभाल करणारे मिस्त्री अनिल शिवले व तन्मय कुंदुरकर यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले. यावेळी अनिल अगावणे म्हणाले, "दवाखान्यात गेल्यावर ऑक्सिजनची खरी किंमत कळते. तरीही विकासाच्या नावाखाली हजारो झाडांची कत्तल वारंवार सुरूच असते. त्यामुळे निसर्गाचे कालचक्र बदलले असून, त्याचे दुष्परिणाम आपल्या सर्वांना वेळोवेळी भोगावे लागत आहेत." ते पुढे म्हणाले, "निसर्गाच्या रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश केवळ बोलण्यात न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी असे समाजोपयोगी व जीवनावश्यक उपक्रम राबविण्यात यावेत." या उपक्रमातून नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश घेतला असून, वृक्षारोपणाबरोबरच लावलेल्या झाडांचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले.



- वृत्तपत्र लेखक अनिल अगावणे यांच्या हस्ते वृक्षारोपण; 'झाडे लावा, झाडे जगवा' उपक्रम

### Mivi One स्मार्टफोन २४ सप्टेंबरला Flipkart वर लॉँच

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय ग्राहकोपयोगी तंत्रज्ञान क्षेत्रातील स्वदेशी ब्रँड Mivi ने स्मार्टफोन बाजारात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. Qualcomm, Flipkart आणि Google यांच्या धोरणात्मक भागीदारीसह कंपनीचा पहिला स्मार्टफोन Mivi One २४ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ Flipkart वर लॉँच करण्यात येणार आहे. भारतीय ग्राहकांच्या गरजा आणि वापराच्या पद्धती लक्षात घेऊन Mivi One विकसित करण्यात आला आहे. कंपनीच्या माहितीनुसार, आपल्या श्रेणीमध्ये Snapdragon 5G चिपसेट असलेला हा भारतातील एकमेव स्मार्टफोन असेल. Mivi One ची निर्मिती कंपनीच्या हैदराबाद येथील कारखान्यात केली जाणार आहे. Mivi गेल्या दशकभरापासून भारतातील पर्सनल आणि होम ऑडिओ क्षेत्रात कार्यरत असून, ट्रू वायरलेस इअरबड्स, नेकबँड्स, हेडफोन्स, स्पीकर्स आणि साउंडबार्स यांसारख्या उत्पादनांसाठी ग्राहकांमध्ये ओळख निर्माण केली आहे. उत्पादन विकास, डिझाइन, संशोधन व विकास आणि उत्पादन या क्षेत्रातील कंपनीचा भारतातील अनुभव स्मार्टफोन व्यवसायातही उपयोगात आणला जाणार आहे.




# पावसाअभावी दोन हेक्टर सोयाबीन करपले

## पतीच्या निधनानंतर शेतीचा संसार सांभाळणाऱ्या वंदना गाटे यांची शासनाकडे न्यायाची आर्त हाक

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले सोयाबीनचे पीक करपून गेले आहे. बार्शी तालुक्यातील सारोळे येथील श्रीमती वंदना शत्रुघ्न गाटे यांच्या दोन हेक्टर क्षेत्रातील सोयाबीन पिकाचे पावसाअभावी अक्षरशः जळून नुकसान झाले आहे. पतीच्या निधनानंतर आपल्या परिवारासह शेतीचा संसार सांभाळणाऱ्या वंदना गाटे यांच्यावर पुन्हा एकदा आर्थिक संकट कोसळले आहे.



कर्जबाजारीपणामुळे पती शत्रुघ्न गाटे यांनी आत्महत्या केल्यानंतर वंदना गाटे यांनी आपल्या परिवारासह शेतीची जबाबदारी स्वीकारली. मोठ्या कष्टाने, जिद्दीने आणि आशेने त्यांनी शेती सुरू ठेवली. मात्र, यंदा पावसाअभावी सोयाबीनचे पीक करपल्याने त्यांच्या मेहनतीवर पाणी फिरले आहे. पिकासाठी केलेला खर्च, घेतलेली मेहनत आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाच्या आशा या सगळ्यांवर संकट आले आहे. "पतीच्या निधनानंतर परिवारासह शेती करत आहे. मोठ्या कष्टाने पीक उभे केले होते; मात्र पावसाअभावी दोन हेक्टर सोयाबीनचे पीक अक्षरशः जळून गेले. आता सी तरी शासनाने आमच्या नुकसानीची दखल घेऊन न्याय द्यावा आणि पूर्ण नुकसानभरपाई द्यावी," अशी आर्त मागणी वंदना शत्रुघ्न गाटे यांनी केली. शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आणणाऱ्या या परिस्थितीत प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा करावा. पिकांचे नुकसान म्हणजे केवळ आर्थिक तोटा नसून, शेतकरी कुटुंबाच्या उदरनिर्वाहावर आलेले संकट आहे. त्यामुळे शासनाने संवेदनशीलतेने दखल घेऊन वंदना गाटे यांच्यासह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी होत आहे.

# शॉर्ट रूट बस सुरू करून प्रवाशांची गैरसोय दूर व्हावी यासाठी निवेदन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड परिसरातील वाढती लोकसंख्या, नवनवीन गृहप्रकल्प आणि अपुऱ्या बससेवेमुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. गर्दीच्या वेळी खडकवासला येथून शॉर्ट रूट बसेस सुरू कराव्यात, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत पीएमपीएमएल प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

सिंहगड रोडवरील बसेसची संख्या प्रवाशांच्या तुलनेत कमी पडत असल्याने शाळकरी मुले, महिला आणि नागरिकांना उभे राहून प्रवास करावा लागत आहे.

माणिकबाग येथे झालेल्या अपघातात एका मुलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून, अशा दुर्घटना टाळण्यासाठी



सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. खानापूर, सिंहगड आणि पानशेत परिसरातून सकाळच्या वेळी पुण्याकडे येणाऱ्या बसेस प्रवाशांनी भरलेल्या असतात. तसेच, संध्याकाळी पुणे शहरातून या भागाकडे जाणाऱ्या बसेसमध्ये मोठी गर्दी असते. त्यामुळे खडकवासला, कोल्हेवाडी, किरकटवाडी आणि नांदेड परिसरातील प्रवाशांना वेळेवर बस मिळत नाही. बस मिळाली तरी अनेकदा उभे राहून प्रवास करावा लागतो. पूर्वी डीआयएटी येथून शॉर्ट रूट बसेस उपलब्ध असल्याने ही समस्या तुलनेने कमी होती. त्यामुळे गर्दीच्या वेळी, विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी, खडकवासला येथून शॉर्ट रूट बसेस सुरू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते व माजी पंचायत समिती सदस्य नितीन वाघ, तसेच गोकुळ करंजावणे, संतोष गोपाळ, तानाजी गाढवे, अजय मते, अक्षय सावंत, सौरभ मोकाशी आणि आकाश पायगुडे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे. सिंहगड रोडवरील प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी पीएमपीएमएल प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
शनिवार, दि. ०५ सप्टेंबर २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



### आ. तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य

कोंढवे-धावडे (आरंभ पर्व) : खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त चैतन्य बालक युवक व महिला मागासवर्गीय विकास संस्था, कोंढवे-धावडे यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी आमदार भीमराव अण्णा तापकीर, प्रभाग क्रमांक ३३ चे नगरसेवक सुभाष नाणेकर, सचिन भाऊ दांगट, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुण भाऊ दांगट, कोंढवे-धावडे गावचे माजी सरपंच उमेश भाऊ सरपाटील, अभिजीत धावडे, सुभाषजी शिंदे, शिवाजी चव्हाण, शिक्षक-शिक्षिका आणि विद्यार्थी उपस्थित होते. आमदार भीमराव अण्णा तापकीर यांनी चैतन्य संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश भाऊ साळवे यांच्या नेतृत्वाखाली संस्था चांगले काम करत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष प्रकाश भाऊ साळवे यांनी केले होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.




### धायरीतील नूतन प्री प्रायमरी स्कूलमध्ये चिमुकल्यांची गोकुळनगरी


धायरी (आरंभ पर्व) : गणेशनगर, धायरी येथील नूतन प्री प्रायमरी स्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा, गोप-गोपी यांच्या वेशभूषेत सहभागी होत शाळेच्या परिसरात गोकुळनगरीचा देखावा उभा केला. या वेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीला, माखनचोरी, गोकुळातील विविध प्रसंग तसेच दहीहंडीचे सादरीकरण केले. भक्तिगीते, नृत्य, संवाद आणि छोटेखानी नाटिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. चिमुकल्यांच्या निरागस अभिनयाला पालक व शिक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. संस्थापिका सौ. सुनीता डांगे यांची आवर्जून उपस्थिती लाभली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना श्रीकृष्ण जन्माष्टमीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगण्यात आले. भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख विद्यार्थ्यांना लहान वयातच व्हावी, तसेच सण-उत्सवांच्या माध्यमातून त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, धैर्य, सहकार्य आणि सदाचाराचे संदेश आपल्या सादरीकरणातून दिले. रंगीबेरंगी वेशभूषा, आकर्षक सजावट आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे शाळेच्या परिसरात आनंदाचे व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रेवती गावडे, अमृता गंगावणे, साक्षी डांगे, योगिनी उध्वंत आणि नंदा पटवारी यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### नवोन्मेष प्रवेगक कार्यक्रम $MC^2$+ IGNITE चे सह-आयोजन



पुणे (आरंभ पर्व) : इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड (इंडियनऑइल), व्हेंचर सेंटर आणि सीएसआयआर –नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (सीएसआयआर-एनसीएल) यांच्या संयुक्त विद्यमाने आज एनसीएल मुख्य सभागृहात $MC^2$+ IGNITE — भारतातील प्रमुख ऊर्जा नवोन्मेष प्रवेगक कार्यक्रमाच्या पुणे आउटरीचचे सह-आयोजन करण्यात आले."Advancing Energy Innovations" या शीर्षकाखाली आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम $MC^2$ Foundation च्या मार्गदर्शनाखाली तसेच पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मार्गदर्शनाने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात देशातील प्रमुख ऊर्जा कंपन्या, संशोधन संस्था, डीप-टेक स्टार्ट-अप्सचे संस्थापक आणि वैज्ञानिक समुदाय एकत्र आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते पद्मविभूषण डॉ. आर. ए. माशेलकर, एफआरएस यांनी या उपक्रमाला "योग्य वेळी सुरू झालेला आणि खऱ्या अर्थाने परिवर्तनकारी" उपक्रम असे संबोधले. आइन्स्टाईन यांच्या समीकरणाचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, देशातील ऊर्जा क्षेत्रातील प्रमुख कंपन्या भारतातील नवोन्मेषकांच्या पाठबळासाठी प्रयोगशाळा, सुविधा, मार्गदर्शन, भांडवल आणि बाजारपेठेतील प्रवेश या सर्व बाबी एकत्र आणत आहेत. त्यांनी संस्थापकांना संपूर्ण आणि सर्वसमावेशक उपाय विकसित करण्याचे आवाहन केले ज्यामुळे भारताचा प्रवास "Make in India" पासून "Innovate in India" आणि अखेरीस "Own in India" पर्यंत होऊ शकेल.

### पालकत्व, विश्वास आणि नात्यांची गुंतागुंत उलगडणारा 'अडकित्ता'




मुंबई (आरंभ पर्व) : पालकत्व, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या नात्यांमधील गुंतागुंत उलगडणारा 'अडकित्ता' हा नवा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आशुतोष परांडकर दिग्दर्शित या चित्रपटाचा प्रीमियर ११ सप्टेंबर २०२६ रोजी केवळ झी5वर होणार आहे. सई ताम्हणकर, सिद्धार्थ चांदेकर आणि सखी गोखले यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट कुटुंब, करिअर, पालकत्व आणि नात्यांतील विश्वास यांचा भावनिक वेध घेणार आहे. मंगेश पवार अँड कंपनी आणि जॅकपॉट एंटरटेनमेंट निर्मित 'अडकित्ता'मध्ये आजच्या शहरी जीवनातील वास्तव आणि पालकत्वासमोरील आव्हाने प्रभावीपणे मांडण्यात आली आहेत. करिअर आणि कुटुंब यांचा समतोल साधताना तरुण जोडप्याला करावी लागणारी धडपड, त्यातून निर्माण होणारे ताणतणाव आणि दुसऱ्यावर वाढत जाणारे अवलंबित्व या सगळ्याचा प्रवास चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

# केसरिया मित्र मंडळातर्फे उज्जैनच्या महाकाल मंदिराचा देखावा



पुणे (दै. आरंभ पर्व)

फर्ग्युसन कॉलेज रोड येथील केसरिया मित्र मंडळ ट्रस्टतर्फे यंदाच्या सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त उज्जैन येथील महाकाल नगरीचा भव्य देखावा साकारण्यात येणार आहे. यामध्ये महाकालेश्वर मंदिराची प्रतिकृती, भगवान महाकाल यांचा तांडव तसेच भस्म आरती सोहळा सादर करण्यात येणार आहे. या देखाव्याचे निमंत्रण मंडळाच्या महिला अध्यक्षा भावना छाजेड यांनी पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना दिले.

मागील वर्षी मंडळातर्फे गंगा आरती देखावा आयोजित करण्यात आला होता . त्यानंतर यंदा उज्जैनच्या धार्मिक परंपरेचा अनुभव भाविकांना पुण्यातच घेता यावा, या उद्देशाने महाकाल नगरीचा देखावा साकारण्यात येत आहे. पुनीत बालन यांच्या प्रेरणेने केसरिया मित्र मंडळाने यंदा पारंपरिक गणेशोत्सवात सहभाग घेतला आहे.

केसरिया मित्र मंडळाचे वैशिष्ट्य म्हणजे मंडळाच्या अध्यक्षपदी महिला नेतृत्व आहे. मंडळातर्फे वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, विविध सामाजिक कार्यक्रम तसेच धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

सन २०११ पासून मंडळातर्फे सातत्यपूर्ण आणि उत्साहपूर्ण गणेशोत्सव साजरा केला जात आहे. यंदाच्या देखाव्यात उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरातील धार्मिक वातावरणाची अनुभूती देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. भस्म आरती ही उज्जैनच्या धार्मिक परंपरेतील महत्त्वाची आरती असून, तिचे महत्त्व भाविकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न मंडळातर्फे केला जाणार आहे.




या वेळी संस्थापक मांगिलाल छाजेड यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यक्ष भावना छाजेड व मंडळ कार्यकर्ते सक्रिय सहभाग घेत आहेत. यावेळी सामाजिक कार्यकर्ते प्रतीक राजेंद्र शुक्ल, प्रविण गजरमल, कृष्णा वांजळे, आणि सौरभ मांगिलाल छाजेड , विशाल दायमा, आंचल विश्वकर्मा, विशाल दायमा ,प्राची गायकवाड यांची उपस्थिती होती.

"पुण्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशात मानाचे स्थान असलेल्या केसरिया मित्र मंडळातर्फे यंदा साकारण्यात येणारा उज्जैन महाकाल नगरीचा देखावा भाविकांना आध्यात्मिक अनुभूती देणारा ठरेल," असे भावना छाजेड यांनी सांगितले. नागरिकांनी या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

### एअरटेलच्या ३७.६ कोटी ग्राहकांना ड्युओलिंगोकडून १२ महिन्यांचे सुपर सबस्क्रिप्शन

पुणे (दै. आरंभ पर्व)

जगातील आघाडीच्या मोबाइल लर्निंग प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या ड्युओलिंगोने भारती एअरटेलसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत एअरटेलच्या 37.6 कोटी ग्राहकांना 12 महिने सुपर ड्युओलिंगोची सुविधा कोणतेही अतिरिक्त शुल्क न देता मिळणार आहे. ड्युओलिंगोवर 40 हून अधिक भाषांचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. छोटे धडे, गेम्स आणि एआयच्या मदतीने भाषा शिकणे सोपे आणि मनोरंजक बनवले जाते. या भागीदारीमुळे एअरटेलच्या ग्राहकांना जाहिरातमुक्त शिक्षण, एआयच्या मदतीने बोलण्याचा सराव, वैयक्तिक सराव आणि चुका सुधारण्याची सुविधा मिळणार आहे. आजच्या काळात भाषेचे कौशल्य शिक्षण, करिअर आणि




जागतिक संधींसाठी महत्त्वाचे ठरत आहे. या भागीदारीमुळे एअरटेलच्या ग्राहकांना दर्जेदार डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्मद्वारे सोप्या आणि मनोरंजक पद्धतीने भाषा शिकण्याची संधी मिळणार आहे. सुपर ड्युओलिंगोची सुविधा एअरटेलच्या मोबाइल, वाय-फाय आणि डीटीएच ग्राहकांना मिळणार आहे. ग्राहक एअरटेल अॅपद्वारे या ऑफरचा लाभ घेऊ शकतात. यासाठी क्रेडिट कार्डची आवश्यकता असणार नाही.

# वृद्धांच्या सेवेसाठी 'विसावा'चा नवा अध्याय





पुणे (दै. आरंभ पर्व)

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभमुहूर्तावर विसावा सोशल फाऊंडेशन वृद्धाश्रमाच्या नव्या जागेचा भूमिपूजन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वृद्धांच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या संस्थेच्या कार्याला या नव्या जागेमुळे अधिक व्यापक स्वरूप मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

माजी गृहमंत्री रमेशभाऊ बागवे, ज्येष्ठ अभिनेते सुनील गोडबोले, धनराज हरडे, नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, नगरसेविका धनश्री ताई कोल्हे आणि नगरसेवक काकासाहेब चव्हाण यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे संस्थापक डॉ. बी. एन. खरात, सुनीताताई डांगे, अनिताताई राकडे, सुजाताताई म्हस्के, चेतन मराठे, बलभीम कुरुंद, मल्लिकार्जुन मुंडेवाडी, सागर पाटील, यशवंत लायगुडे , तुषार पोकळे यांच्यासह सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

संस्थेच्या संस्थापक-अध्यक्षा स्वातीताई तरडे-मुंडेवाडी यांनी उपस्थितांचे स्वागत करून संस्थेच्या सेवाकार्यास मिळणाऱ्या सहकार्याबद्दल आभार मानले. वृद्धांना आधार, आपुलकी आणि सन्मान देण्याचा संस्थेचा संकल्प यापुढेही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. वृद्धांच्या सेवेसाठी समाजातील विविध घटकांचे सहकार्य लाभत असून, नव्या जागेमुळे संस्थेच्या कार्याला नवी दिशा मिळणार आहे.

*धर्म हा माणसाच्या अंतर्मनाशी जोडलेला विषय आहे. तो श्रद्धेचा, संस्कारांचा आणि आत्मिक समाधानाचा मार्ग आहे. मात्र जेव्हा धर्म श्रद्धेच्या चौकटीतून बाहेर पडून रस्त्यावर येतो, तेव्हा त्याचे स्वरूप बदलू लागते. भक्तीचे रूपांतर शक्तिप्रदर्शनात, श्रद्धेचे रूपांतर घोषणाबाजीत आणि धार्मिक भावनेचे रूपांतर संघर्षात होण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच धर्म माणसाच्या मनात असावा; तो रस्त्यावर येता कामा नये.*

# धर्म रस्त्यावर नकोच

## श्रद्धा व्यक्त करण्यासाठी दुसऱ्याला त्रास देण्याची गरज नसते




(दै. आरंभ पर्व)

धर्माने माणसाला संयम शिकवला, सहिष्णुता शिकवली, दुसऱ्याच्या श्रद्धेचा आदर करायला शिकवले. कोणत्याही धर्माचा मूलभूत संदेश पाहिला तर त्यामध्ये माणुसकी, प्रेम, करुणा, सत्य, सेवा आणि सदाचार यांनाच महत्त्व दिलेले दिसते. मग धर्माच्या नावावर रस्ते अडवणे, वाहतूक ठप्प करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, दुसऱ्याच्या श्रद्धेला आव्हान देणे किंवा समाजात तणाव निर्माण करणे हा धर्माचा मार्ग कसा असू शकतो?

आपल्या देशाची खरी ताकद विविधतेत आहे. वेगवेगळे धर्म, पंथ, भाषा, परंपरा आणि संस्कृती यांचे लोक शतकानुशतके एकत्र राहत आले आहेत. या सहजीवनामुळे भारताची ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे एखाद्याची धार्मिक भावना जपताना दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आणि सार्वजनिक जीवनातील अधिकारांचा विचार करणेही तितकेच आवश्यक आहे.

धार्मिक उत्सव हे आनंदाचे आणि सामूहिक एकतेचे प्रसंग असतात. मात्र उत्सवाचा आनंद इतरांसाठी त्रासदायक ठरू लागला, तर त्याचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. ध्वनिप्रदूषण, वाहतूक कोंडी, रस्त्यांवरील अतिक्रमण, कचरा, सार्वजनिक जागेचा गैरवापर किंवा धार्मिक घोषणांच्या नावाखाली निर्माण होणारा तणाव यामुळे सामान्य नागरिकांना त्रास होत असेल, तर त्या उत्सवाचा हेतूच हरवतो. धर्माच्या नावावर राजकारण केले जाते, तेव्हा परिस्थिती आणखी गंभीर होते. धार्मिक भावना ही अत्यंत संवेदनशील बाब आहे. त्यामुळे तिचा वापर मतांसाठी, समाजाला विभागण्यासाठी किंवा स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी केला जाऊ नये. राजकारणाने विकास, रोजगार, शिक्षण, आरोग्य, महागाई आणि नागरिकांच्या प्रश्नांवर चर्चा करावी; धर्म हा समाजाला जोडण्यासाठी असावा, तो मतभेद वाढविण्याचे साधन बनू नये. आज सामाजिक माध्यमांमुळे धार्मिक विषय अधिक संवेदनशील झाले आहेत. एखादा जुना व्हिडिओ, चुकीची माहिती किंवा जाणीवपूर्वक केलेली भडकावू पोस्ट काही क्षणांत हजारो लोकांपर्यंत पोहोचते. त्यातून गैरसमज आणि तणाव निर्माण होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने 'मला आलेला संदेश खरा आहे का?' याचा विचार करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. अफवा पुढे पाठवण्यापेक्षा विवेक पुढे नेणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. धर्माच्या नावाने माणसामाणसांत भिंती उभ्या राहिल्या, तर धर्माचा पराभव होतो. उलट, धर्मामुळे माणूस अधिक संवेदनशील, प्रामाणिक आणि परोपकारी झाला, तर धर्माचे खरे सार्थक होते. मंदिर, मशीद, गुरुद्वारा, चर्च किंवा कोणतेही श्रद्धास्थान माणसाला शांतता देण्यासाठी असते; संघर्षाची ठिणगी पेटवण्यासाठी नव्हे.

आपण आपल्या श्रद्धेचा अभिमान नक्कीच बाळगावा. मात्र आपला धर्म मोठा आहे हे सिद्ध करण्यासाठी दुसऱ्याचा धर्म लहान करण्याची गरज नाही. स्वतःच्या श्रद्धेवर विश्वास असणाऱ्या माणसाला दुसऱ्याच्या श्रद्धेची भीती वाटत नाही. खरा धार्मिक माणूस आपल्या आचरणातून धर्म दाखवतो; घोषणांमधून किंवा शक्तिप्रदर्शनातून नव्हे.

आज गरज आहे ती धर्माला रस्त्यावर आणण्याची नव्हे, तर धर्मातील माणुसकी घराघरांत आणि मनामनांत नेण्याची. रस्ते सर्वांसाठी आहेत. सार्वजनिक जागा सर्वांच्या आहेत. शहर, गाव आणि देशही सर्वांचा आहे. त्यामुळे कोणत्याही धर्माच्या नावाखाली सामान्य नागरिकांचे जीवन विस्कळीत होणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

धर्म मनाला जोडणारा असावा, समाज तोडणारा नव्हे. श्रद्धा अंतर्मनात असावी, तिचे प्रदर्शन रस्त्यावर असण्याची गरज नाही.

शेवटी एवढेच, देवाला मोठा आवाज नको; निर्मळ मन हवे. धर्माला गर्दी नको; आचरण हवे. श्रद्धेला संघर्ष नको; संयम हवा. आणि समाजाला रस्त्यावरचा धर्म नव्हे, तर माणसाच्या मनातला धर्म हवा. कारण धर्म जेव्हा मनात असतो, तेव्हा तो माणूस घडवतो; आणि धर्म जेव्हा रस्त्यावर उतरतो, तेव्हा अनेकदा माणसांमध्ये अंतर निर्माण करतो.

### जयदीप बगाडे यांना 'तुफानातील दिवे' पुरस्काराने सन्मानित



- नांदेडमध्ये उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल गौरव
- आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

दौंड (दै. आरंभ पर्व)

दौंडचे भूमिपुत्र आणि दैनिक लोकन्याय संघर्षचे पुणे जिल्हा प्रतिनिधी पत्रकार जयदीप माणिक बगाडे यांना उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल नांदेड येथे 'तुफानातील दिवे' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. युगकवी वामनदादा कर्डक आणि प्रतापसिंग बोदडे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बगाडे यांना सन्मानचिन्ह व गौरवपत्र प्रदान करून त्यांच्या पत्रकारितेचा गौरव करण्यात आला.

नांदेड येथे विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार व पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल दौंड येथून जयदीप बगाडे यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन नांदेड महापालिका गटनेते इंजि. प्रशांत इंगवले यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरदादा चंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. निमंत्रक संजय भाऊ निवडूंगे, सहाय्यक वामनराव कावळे, कांबळे तसेच अन्य सहकाऱ्यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. स्वागताध्यक्ष म्हणून गौतम कदम यांनी जबाबदारी सांभाळली.

कार्यक्रमात चंद्रकांत प्रल्हाद शिंदे, नागसेनदादा सावदेकर, कुणाल वराळे, अजय देहाडे, खरात ताई यांच्यासह स्टार प्रवाह फेम छोट्या गायकांनी तसेच अन्य गायकांनी आपल्या गीतांमधून गुरू-शिष्यांना अभिवादन केले. पंचक्रोशीतील आंबेडकर अनुयायी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार मिळाल्यानंतर जयदीप बगाडे यांचा विविध मान्यवर आणि संस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. दैनिक लोकन्याय संघर्षचे संपादक बाजीराव गायकवाड पाटील, नांदेड जिल्हा प्रतिनिधी वनखाडे, सोनकांबळे मॅडम, गायकवाड सर तसेच अन्य सदस्यांनी गेस्ट हाऊस येथे जाऊन त्यांचा सत्कार केला.

# कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्सतर्फे ‘मंगळागौरीचे खेळ’ उत्साहात

## पारंपरिक खेळ, उखाणे आणि मनोरंजनाच्या उपक्रमांनी रंगला महिलांचा जल्लोष; सांस्कृतिक परंपरांना उजाळा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेतील मंगळागौरीचे खेळ आजच्या आधुनिक जीवनशैलीतही जिवंत राहावेत आणि महिलांना एकत्र येऊन आनंदाचे क्षण अनुभवता यावेत, या उद्देशाने कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्स यांच्या वतीने ‘मंगळागौरीचे खेळ’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वेंकटेश स्कायडेल, राजाराम पुलाजवळ, सिंहगड रोड येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांनी विविध खेळांचा मनमुराद आनंद लुटत कार्यक्रमात उत्साह आणि चैतन्य निर्माण केले.




### उत्साह, हास्य आणि आनंदाने अविस्मरणीय ठरला कार्यक्रम

मंगळागौरीच्या पारंपरिक खेळांपासून उखाणे स्पर्धेपर्यंत आणि विविध मनोरंजनात्मक उपक्रमांपासून पारंपरिक वेशभूषेपर्यंत कार्यक्रमातील प्रत्येक घटकाने उपस्थित महिलांना आनंद दिला. हास्य-विनोद, टाळ्यांचा कडकडाट आणि उत्साहपूर्ण सहभागामुळे संपूर्ण परिसरात मंगळागौरीचा उत्सवी माहोल निर्माण झाला.

मंगळागौरी हा केवळ धार्मिक किंवा पारंपरिक उत्सव नसून, महाराष्ट्राच्या लोकजीवनात महिलांना एकत्र आणणारा, त्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि सामाजिक संवाद वाढविणारा उत्सव म्हणून त्याचे विशेष महत्त्व आहे. याच परंपरेची आठवण नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पारंपरिक मंगळागौरीच्या खेळांना विशेष स्थान देण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात झाली. पारंपरिक खेळांमध्ये महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. फुगड्या, झिम्मा तसेच विविध समूह खेळांमध्ये सहभागी होताना महिलांच्या चेहऱ्यावरचा आनंद स्पष्टपणे जाणवत होता. अनेक महिलांनी आपल्या बालपणीच्या आणि माहेरच्या आठवणींना उजाळा देत पारंपरिक खेळांचा आनंद घेतला. खेळांदरम्यान उमटणाऱ्या हास्याच्या लकेरी आणि टाळ्यांच्या कडकडाटामुळे संपूर्ण परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमातील उखाणे स्पर्धा हा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. महिलांनी उत्स्फूर्तपणे आणि कल्पकतेने उखाणे सादर करत कार्यक्रमात रंगत आणली. पारंपरिक ढंगातील उखाण्यांसोबतच आधुनिक संदर्भ, विनोद आणि शब्दांच्या चपखल वापरामुळे स्पर्धेला चांगलीच दाद मिळाली. सहभागी महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी उपस्थितांकडून टाळ्यांचा कडकडाट करण्यात आला.

उखाणे ही महाराष्ट्राच्या कौटुंबिक आणि सांस्कृतिक परंपरेचा एक महत्त्वाचा भाग असून, त्यामध्ये भाषेचा गोडवा, विनोदबुद्धी आणि सर्जनशीलता दिसून येते. या परंपरेला कार्यक्रमाच्या माध्यमातून व्यासपीठ मिळाल्याने महिलांनी त्याचे विशेष स्वागत केले.

कार्यक्रमासाठी अनेक महिलांनी पारंपरिक नऊवारी साडी, पैठणी, नथ, ठुशी, हार, बांगड्या आणि अन्य पारंपरिक दागिन्यांनी सजून सहभाग घेतला. त्यामुळे कार्यक्रमस्थळी जणू पारंपरिक महाराष्ट्राची संस्कृतीच अवतरल्याचे चित्र पाहायला मिळाले. पारंपरिक वेशभूषा आणि मंगळागौरीच्या खेळांमुळे कार्यक्रमाचे सौंदर्य अधिक खुलून आले. महिलांनी एकमेकींसोबत संवाद साधत जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेक खेळांमध्ये सहभागी होताना वयाचे बंधन बाजूला ठेवून सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यामुळे कार्यक्रमाला केवळ मनोरंजनाची जोड मिळाली नाही, तर महिलांमध्ये आपलेपणा आणि सामाजिक संवादाची भावना अधिक दृढ झाली. कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना दैनंदिन धावपळीतून काही काळ दूर जाऊन मैत्रिणी, कुटुंबीय आणि परिचित महिलांसोबत आनंदाचे क्षण घालविण्याची संधी मिळाली. त्यामुळे कार्यक्रमाला सांस्कृतिक उपक्रमासोबतच सामाजिक संवादाचेही स्वरूप प्राप्त झाले.

### जुन्या परंपरांना नव्या पिढीशी जोडण्याचा प्रयत्न

आजच्या धावपळीच्या जीवनात पारंपरिक खेळ, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक उपक्रमांकडे काही प्रमाणात दुर्लक्ष होत आहे. अशा परिस्थितीत मंगळागौरीसारख्या परंपरांचे जतन करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे ठरते. विशेषतः नव्या पिढीतील महिलांना या खेळांची आणि परंपरांची ओळख व्हावी, त्यामागील सांस्कृतिक संदर्भ समजावा आणि त्या परंपरा पुढेही टिकून राहाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू होता.

“परंपरेचा आनंद आणि नव्या पिढीला आपल्या सांस्कृतिक परंपरांशी जोडण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. मंगळागौरीचे खेळ ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. महिलांनी एकत्र येऊन या खेळांचा आनंद घ्यावा, जुन्या आठवणींना उजाळा द्यावा आणि पुढील पिढीपर्यंत ही परंपरा पोहोचावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते,” असे आयोजकांकडून सांगण्यात आले. कार्यक्रमात सहभागी झालेल्या महिलांनीही या उपक्रमाचे कौतुक केले. पारंपरिक खेळांसाठी स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल आणि महिलांना एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची संधी दिल्याबद्दल आयोजकांचे आभार मानण्यात आले. परंपरा केवळ जपण्यापेक्षा ती पुढील पिढीला अनुभवता यावी, तिच्यात सहभागी होता यावे आणि तिचा आनंद घेता यावा, यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे या कार्यक्रमातून अधोरेखित झाले. कृष्णा राजाराम अष्टेकर ज्वेलर्स यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेला हा ‘मंगळागौरीचे खेळ’ कार्यक्रम महिलांसाठी आनंदाचा, उत्साहाचा आणि सांस्कृतिक परंपरांच्या स्मरणाचा अविस्मरणीय अनुभव ठरला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशनचा वर्धापन दिन साजरा

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशन राजगुरुनगर संस्थेचा वर्धापन दिन व हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या ११८ व्या जयंतीचे औचित्य साधून हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशन राजगुरुनगर संस्थेच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी खेड तालुक्यातील प्रथम महिला माउंट एवरेस्ट गिर्यारोहक सुविधा कडलक यांना 'हुतात्मा राजगुरू क्रीडा गौरव पुरस्कार' देण्यात आला. तसेच अनंत तायडे यांना महाराष्ट्र शासन वनश्री पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वृक्ष लागवड व संवर्धन या कार्याबद्दल तसेच खेड तालुका ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष मधुकर खेडकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चैतन्य संस्थेच्या संस्थापिका सुधा कोठारी तर प्रमुख अतिथी म्हणून राजगुरुनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, शिवसेनेच्या विजया शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष हिरामण सातकर, जि. र. शिंदे (गुरुजी) उपस्थित होते. हुतात्मा राजगुरू सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, उपाध्यक्ष नाजनीन शेख, सचिव अमर टाटिया, संचालक ॲड. मनीषा पवळे, राजन जांभळे, ॲड.सुनील वाळुंज, संगीता तनपुरे, मधुकर गिलबिले, मीनाक्षी पाटोळे, डॉ. नीलम गायकवाड, राहुल मलघे, राहुल वाळुंज, दत्ता रुके आदींनी कार्यक्रमाचे संयोजन केले. सूत्रसंचालन आकाश बोंबले यांनी केले.

### डोळ्यांसमोर अंधार; उपचारांनी पुन्हा दिसू लागले जग!

पुणे (आरंभ पर्व) : कामाच्या ठिकाणी इलेक्ट्रिकचे काम सुरू होते... अचानक शॉर्ट सर्किट झाले आणि क्षणार्धात मोठा ब्लास्ट झाला. या ब्लास्टमधून उडालेले मेटलचे कण थेट डोळ्यात जाऊन घुसले. चेहऱ्यावरही भाजल्याच्या जखमा झाल्या. काही क्षणांपूर्वी व्यवस्थित दिसणाऱ्या ३५ वर्षीय फोरमॅनच्या डोळ्यांसमोर अचानक अंधार पसरला. डोळे उघडणेही शक्य होत नव्हते. मात्र, सहकाऱ्यांनी प्रसंगावधान राखत त्यांना तातडीने पुण्यातील डॉ. दूधभाते नेत्रालय व रेटिना सेंटर येथे आणले. डॉक्टरांनी त्वरित उपचार सुरू केले आणि या गंभीर दुखापतीनंतर रुग्णाच्या दृष्टीत आशादायक सुधारणा होऊ लागली. ही घटना पुण्यातील नामांकित इंजिनीअरिंग कंपनीमध्ये इलेक्ट्रिकचे काम करताना घडली.

## AI फीचर्स सह विवोचा नवा T5 स्मार्टफोन लाँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विवो इंडियाने आपल्या परफॉर्मन्स-केंद्रित T-सिरीजमध्ये विवो T5 हा नवा स्मार्टफोन दाखल केला आहे. तरुण आणि तंत्रज्ञानप्रेमी ग्राहकांना लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये दमदार प्रोसेसर, मोठी बॅटरी, प्रीमियम डिस्प्ले, AI क्षमता आणि मल्टी-कॅमेरा सेटअप देण्यात आला आहे. विवो T5ची सुरुवातीची किंमत ₹३४,९९९ आहे. विवो T5मध्ये MediaTek Dimensity 7500 Turbo प्रोसेसरसह AI-रेडी NPU इंजिन देण्यात आले आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, या तंत्रज्ञानामुळे 3B




LLM मॉडेलवरील ऑन-डिव्हाइस AI जनरेशनमध्ये २३३ टक्क्यांपर्यंत वेग मिळतो. ४nm प्रक्रियेवर आधारित या चिपसेटमध्ये ऑक्टा-कोर CPU, Kraken GPU आर्किटेक्चर आणि आठव्या पिढीचे NPU देण्यात आले आहे. ७०५० mAh बॅटरी आणि १४४Hz कर्व्हड AMOLED डिस्प्ले फोनमध्ये ७०५०mAh क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली आहे.

## किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीचे एक्सक्लुझिव्ह शोरूम

*हडपसरच्या इमेनोरा मॉलमध्ये शोरूमचे उद्घाटन; ग्राहकांसाठी आकर्षक उद्घाटन ऑफर्स आणि मेगा*

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने पुण्यातील हडपसर येथील इमेनोरा मॉलमध्ये महाराष्ट्रातील आपल्या १०व्या एक्सक्लुझिव्ह शोरूमचे उद्घाटन केले. यावेळी हरी कृष्णा ग्रुपचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक घनश्याम ढोलकिया उपस्थित होते. पुणे आणि परिसरातील ग्राहकांना विश्वसनीयता, गुणवत्ता, आधुनिक डिझाइन्स आणि उत्कृष्ट सेवेसह प्रीमियम डायमंड व गोल्ड ज्वेलरीचा अनुभव उपलब्ध करून देणे हा या नवीन शोरूमचा उद्देश आहे. रोजच्या वापरापासून विशेष



प्रसंग, सण आणि उत्सवांसाठी विविध प्रकारच्या दागिन्यांचा आकर्षक संग्रह येथे उपलब्ध करण्यात आला आहे.

शोरूमच्या उद्घाटनानिमित्त किसनाने ग्राहकांसाठी विशेष ऑफर्स जाहीर केल्या आहेत. ग्राहकांना डायमंड ज्वेलरीच्या घडणावळीच्या शुल्कावर १०० टक्क्यांपर्यंत, तर गोल्ड ज्वेलरीच्या घडणावळीच्या शुल्कावर ५० टक्क्यांपर्यंत सूट मिळणार आहे.

याशिवाय जुने सोने एक्सचेंज करून डायमंड ज्वेलरी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना १०५ टक्क्यांपर्यंत मूल्य मिळण्याची संधी आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात येणाऱ्या मेगा लकी ड्रॉमध्ये ग्राहकांना तीन स्कूटर आणि एका कारचे बक्षीस जिंकण्याची संधीही मिळणार आहे.

## रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्सने बॉम्बे क्रीमरीच्या लाँचसह आईस्क्रीम मार्केटमध्ये धोरणात्मक प्रवेशाची केली घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या दैनंदिन वापरातील ग्राहक उत्पादन विभागातील कंपनी रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडने आज बॉम्बे क्रीमरी या ब्रँडच्या शुभारंभाची घोषणा केली. या माध्यमातून कंपनीने देशातील वेगाने विस्तारत असलेल्या आइस्क्रीम बाजारपेठेत आपल्या धोरणात्मक आणि समर्पित प्रवेशाची सुरुवात केली आहे. रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडच्या देशव्यापी वितरण व्यवस्थेचा, व्यापक किरकोळ बाजारपेठेतील पोहोचीचा तसेच ग्राहकांच्या




पसंती व गरजांविषयीच्या सखोल आकलनाचा भक्कम आधार बॉम्बे क्रीमरीच्या शुभारंभामागे आहे. हे पाऊल आइस्क्रीम क्षेत्राप्रती कंपनीची गंभीर आणि दीर्घकालीन बांधिलकी अधोरेखित करते. बॉम्बे क्रीमरीची उभारणी एका स्पष्ट आणि ठाम वचनावर करण्यात आली आहे—प्रत्येक वेळी अस्सल दुग्धजन्य घटक आणि उत्कृष्ट गुणवत्तेचा अनुभव ग्राहकांना देणे. ‘परवडणाऱ्या किमतीत जागतिक दर्जाची गुणवत्ता’ या आपल्या वचनाशी सुसंगत राहून बॉम्बे क्रीमरीची आइस्क्रीम अस्सल दुधाच्या सायीपासून तयार केली जाते. रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेडचे संचालक टी. कृष्णकुमार म्हणाले, “दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेसाठी कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा शॉर्टकट स्वीकारता कामा नये, या साध्या विचारातून आम्ही बॉम्बे क्रीमरीची उभारणी केली आहे. रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड केवळ आइस्क्रीमच्या क्षेत्रात प्रवेश करत नाही, तर या क्षेत्राप्रती दीर्घकालीन बांधिलकी घेऊन पुढे जात आहे.

## एआय+चा ‘नेक्स्ट क्वांटम ओएस १.१’ सादर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एआय+ स्मार्टफोनने ‘नेक्स्ट क्वांटम ओएस’ची आवृत्ती १.१ सादर केली असून, या नव्या आवृत्तीत गोपनीयता संरक्षणाची चौकट अधिक मजबूत करण्यात आली आहे. तसेच, ॲप्लिकेशन्सना वापरकर्त्यांच्या उपकरणांवरील संसाधने आणि डेटाचा वापर कसा करता येतो, याबाबत अधिक पारदर्शकता आणि नियंत्रण वापरकर्त्यांना मिळणार आहे. डेटा सार्वभौमत्व आणि सुरक्षिततेच्या बांधिलकीचा भाग म्हणून ‘नेक्स्ट क्वांटम’मध्ये कठोर ‘सॉव्हरिन डेटा बाउंड्री’ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे ॲप्लिकेशन्समधून होणारी




१०० टक्के डेटा वाहतूक भारतातच उपलब्ध असलेल्या आणि भारतात होस्ट केलेल्या पायाभूत सुविधांमधून केली जाते. परिमिती सुरक्षा अधिक सक्षम करण्यासाठी या प्रणालीद्वारे १,००० हून अधिक कनेक्शन्स आणि १७२ स्वतंत्र गंतव्य आयपींच्या सोर्स नियमांचे स्वयंचलित विश्लेषण केले जाते. विशेष म्हणजे, सर्व डेटा वाहतूक आणि आयपी पिंग्ज भारताच्या हद्दीतच मर्यादित राहतात.

बोरीबेल विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटीच्या

## चेअरमन पदी तुकाराम पोटे यांची निवड

**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड तालुक्यातील बोरीबेल गावच्या बोरीबेल विविध विकास कार्यकारी सेवा सोसायटीच्या चेअरमन पदी तुकाराम निवृत्ती पोटे यांची तिसऱ्यांदा बिनविरोध निवड करण्यात आली, माजी चेअरमन अंकुश गावडे यांनी आपल्या चेअरमन पदाचा राजीनामा दिल्याने ही निवडणूक घेण्यात आली, चेअरमन पदासाठी तुकाराम पोटे व बापू महाडिक यांचा अर्ज आले होते परंतु छाननी करत असताना बापू महाडिक यांचा अर्ज बाद झाला त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी आर पी गोटखिंडे यांनी तुकाराम



निवृत्ती पोटे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली, यावेळी नवनिर्वाचित चेअरमन तुकाराम पोटे म्हणाले की सर्व सभासद सर्व संचालक मंडळ यांना विश्वासात घेऊन कामकाज करण्यात येईल, यावेळी व्हाईस चेअरमन मंगल सूर्यवंशी, मंगल खोसे, पोपट धुमाळ, कल्याण पाचपुते, बाळकृष्ण पाचपुते, बाळासाहेब लगड, समीर मुलानी, नितीन शेळके, राजू सूर्यवंशी, अभिषेक पोटे, राहुल खळदकर आदीसह सोसायटी सदस्य व संचालक मंडळ उपस्थित होते, सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून राजेंद्र मदने यांनी काम पाहिले.

## दोन गावठी पिस्तूलांसह १० जिवंत काडतुसे जप्त

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

मोक्का कायद्यान्वये यापूर्वी गुन्हा दाखल असलेल्या आरोपीकडून यवत पोलिसांनी दोन गावठी पिस्तूल, १० जिवंत काडतुसे आणि दोन रिकामे मॅगझिन असा एकूण ५५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहजपूर (ता. दौंड) गावच्या हद्दीत करण्यात आली. यवत पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल धिरज जाधव यांना सहजपूर येथील मंगलमूर्ती मिसळ हॉटेलजवळ समीर सय्यद हा गावठी पिस्तूल घेऊन येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने



घटनास्थळी जाऊन सापळा रचला.

पोलिसांनी समीर जावेद सय्यद (वय २६, रा. सहकारनगर, टिळेकरवाडी, ता. हवेली, जि. पुणे) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून दोन लोखंडी गावठी पिस्तूल मॅगझिनसह, १० जिवंत काडतुसे आणि दोन रिकामे मॅगझिन असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल धिरज जाधव यांच्या फिर्यादीवरून समीर जावेद सय्यद याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ३, ७ आणि २५ अन्वये यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड करीत आहेत. पोलिसांच्या तपासात आरोपी समीर सय्यद याच्याविरुद्ध यापूर्वी तीन गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. यापैकी दोन गुन्हे यवत पोलीस ठाण्यात, तर एक गुन्हा लोणी काळभोर पोलीस ठाण्यात मोक्का कायद्यान्वये दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणांमध्ये आरोपी जामिनावर असल्याचेही समोर आले आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिपसिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार आणि दौंड उपविभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तासगांवकर, पोलीस उपनिरीक्षक मारोती मेतलवाड, पोलीस हवालदार रॉकी देवकाते, संदिप देवकर तसेच पोलीस कॉन्स्टेबल धिरज जाधव, अमोल भुजबळ, प्रतिक जगताप, सचिन गुंड, दिनेश लोणकर आणि विनित कुन्हाडे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.